क्रिडा व युवक सेवा संचालनालय
म.रा. पुणे-१
12 APR 2013
आवक क्र.
आवक लिपीक

राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत.

सुधारित / अतिरिक्त तरतूदींचा समावेश

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : खेआस-२०११/(प्र.क्र.६/११)/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १० एप्रिल,२०१३.

**वाचा :-** (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/(प्र.क्र.६८)/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-खेआस-२०१०/(प्र.क्र.२७२/१०)/क्रीयुसे-२, दिनांक ९ डिसेंबर,२०१०,

(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-खेआस-२०११/(प्र.क्र.६/११)/क्रीयुसे-२, दिनांक २१ मे,२०११.

**प्रस्तावना :-** राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती उपरोक्त अनुक्रमांक-२ वरील दिनांक ९.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर कार्यपध्दतीमध्ये उपरोक्त अनुक्रमांक-३ वरील दिनांक २१.५.२०११ च्या शासन निर्णयान्वये काही अतिरिक्त तरतूदींचा समावेश करण्यात आलेला आहे. दिनांक ९.१२.२०१० च्या शासन निर्णयानुसार खेळाडूंकडून शासन सेवेत थेट नियुक्ती मिळण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावांची गुणवत्तेवर छाननी करुन शिफारस करण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने अंतिम शिफारस करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. सदर समितीच्या दिनांक ४.१०.२०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने काही सुधारित/अतिरिक्त तरतूदींचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**: शा स न नि र्ण य :** राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यासंबंधात निर्गमित केलेल्या उपरोक्त दिनांक २१.५.२०११ च्या शासन निर्णयामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

(अ) दिनांक २१.५.२०११ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद-२ येथे केलेली- "खेळाडूने संबंधित स्पर्धेनंतर ६ महिन्यात थेट नियुक्तीसाठी अर्ज करणे आवश्यक राहील" ही तरतूद वगळण्यात येत आहे,

(ब) दिनांक २१.५.२०११ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद-३ येथे केलेली- "खेळाडूंच्या करावयाच्या थेट नियुक्त्या ह्या दिनांक ३०.४.२००५ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत खेळाडूंना नियुक्ती देण्यासाठी विहित केलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या मर्यादेत राहतील" ही तरतूद वगळण्यात येत आहे.

(क) यापुढे अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देताना गट-अ मधील पदावरील नियुक्तीसाठी सोबतच्या परिशिष्ट-"अ" मधील यादीतील खेळ तसेच गट-ब, क व ड मधील पदावरील नियुक्तीसाठी सोबतच्या परिशिष्ट-"ब" मधील यादीतील खेळ ग्राह्य धरण्यात यावेत,

(ड) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना गट-क व ड मधील पदावरील थेट नियुक्ती देताना खालील अधिकृत स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंचा विचार करण्यात यावा :-

<u>गट-क मधील नियुक्तीसाठी</u> :-

दिनांक २१.५.२०११ च्या शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब पदावरील थेट नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या सर्व अधिकृत स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केलेला किंवा या स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू,

<u>गट-ड मधील नियुक्तीसाठी</u> :-

(१) साऊथ एशियन चॅम्पियनशीप व कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू,

<u>किंवा</u>

(२) उपरोक्त आंतरराष्ट्रीय स्पर्धाव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या (किमान ६ देश सहभागी असलेल्या) स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू,

<u>किंवा</u>

(३) गट-अ, ब व क मधील पदावर थेट नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या सर्व अधिकृत स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू,

<u>किंवा</u>

(४) राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये प्रथम क्रमांक.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (**www.maharashtra.gov.in**) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक-२०१३०४१०१४४०२५४६२१** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. शां. परब )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
(२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
(३) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
(४) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(७) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
(९) सर्व मंत्रालयीन विभाग,
(१०) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(११) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१२) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
(१३) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

**शासन निर्णय क्रमांक-खेआस-२०११/(प्र.क्र.६/११)/क्रीयुसे-२, दिनांक १० एप्रिल,२०१३ सोबतचे परिशिष्ट-"अ"**

**गट-अ मध्ये थेट नियुक्ती देण्यासाठी ग्राह्य धरावयाचे क्रीडा प्रकार**

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १ | आर्चरी (धनुर्विद्या) |
| २ | ॲथलेटिक्स |
| ३ | बॅडमिंटन |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | बॉक्सिंग |
| ६ | सायकलिंग |
| ७ | अश्वारोहण (इक्वेस्ट्रियन) |
| ८ | फूटबॉल |
| ९ | फेन्सिंग (तलवारबाजी) |
| १० | जिम्नॅस्टिक्स |
| ११ | हॅण्डबॉल |
| १२ | हॉकी |
| १३ | ज्युडो |
| १४ | कयाकिंग ॲण्ड कॅनॉइंग |
| १५ | कबड्डी |
| १६ | शूटींग |
| १७ | रोइंग |
| १८ | जलतरण (स्विमिंग) (डायव्हिंग व वॉटर पोलोसह) |
| १९ | टेबल टेनिस |
| २० | तायक्वांदो |
| २१ | टेनिस |
| २२ | ट्रायथलॉन |
| २३ | व्हॉलीबॉल |
| २४ | वेटलिफ्टिंग |
| २५ | रेसलिंग (कुस्ती) |
| २६ | चेस (बुध्दिबळ) |
| २७ | क्रिकेट |
| २८ | खो-खो |

**शासन निर्णय क्रमांक-खेआस-२०११/(प्र.क्र.६/११)/क्रीयुसे-२, दिनांक १० एप्रिल,२०१३ सोबतचे**

**परिशिष्ट-"ब"**

**गट-ब, क व ड मध्ये थेट नियुक्ती देण्यासाठी ग्राह्य धरावयाचे क्रीडा प्रकार**

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १ | आर्चरी (धनुर्विद्या) |
| २ | ॲथलेटिक्स |
| ३ | बॅडमिंटन |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | बॉक्सिंग |
| ६ | सायकलिंग |
| ७ | अश्वारोहण (इक्वेस्ट्रियन) |
| ८ | फूटबॉल |
| ९ | फेन्सिंग (तलवारबाजी) |
| १० | जिम्नॅस्टिक्स |
| ११ | हॅण्डबॉल |
| १२ | हॉकी |
| १३ | ज्युडो |
| १४ | कयाकिंग ॲण्ड कॅनॉइंग |
| १५ | कबड्डी |
| १६ | पॉवरलिफ्टिंग |
| १७ | शूटींग |
| १८ | सेलिंग |
| १९ | स्क्वॅश |
| २० | रोइंग |
| २१ | जलतरण (स्विमिंग) (डायव्हिंग व वॉटर पोलोसह) |
| २२ | टेबल टेनिस |
| २३ | तायक्वांदो |
| २४ | टेनिस |
| २५ | ट्रायथलॉन |
| २६ | व्हॉलीबॉल |
| २७ | वेटलिफ्टिंग |
| २८ | रेसलिंग (कुस्ती) |
| २९ | चेस (बुध्दिबळ) |
| ३० | क्रिकेट |
| ३१ | खो-खो |
| ३२ | याटिंग |